# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-10.06.2026** **वार- बुधवार**

---

**राज्यपाल**

संशोधन आणि त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी यांच्यातील दरी दूर करण्यासाठी विद्यापीठे, उद्योग, स्टार्टअप्स, गुंतवणूकदार आणि शासकीय संस्था यांच्यात प्रभावी समन्वय आवश्यक असल्याचं प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केलं आहे. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे तंत्रज्ञान विद्यापीठ आणि कॅनियस इंटरनॅशनल यांच्या संयुक्त विद्यमाने पाषाण इथल्या पुणे इंटरनॅशनल सेंटर इथं आजपासून 12 जूनपर्यंत आयोजित करण्यात आलेल्या 'तंत्रज्ञान संक्रमण आणि नवोपक्रम गतीवर्धक' या आंतरराष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू प्राध्यापक सुनील भिरूड, कॅनियस इंटरनॅशनलचे संस्थापक अध्यक्ष मिलिंद पिंपरकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ, संशोधक, उद्योजक आणि विद्यार्थी उपस्थित होते. या उपक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्राला नवोपक्रम आणि सहकार्याचे केंद्र बनविण्याच्या प्रयत्नांना बळ मिळणार असल्याचं राज्यपालांनी यावेळी सांगितलं. पुणे इंटरनॅशनल सेंटरच्या माध्यमातून पुण्याला पुन्हा एकदा देशाच्या 'विचार नेतृत्वा'चे केंद्र बनविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे डॉ. रघुनाथ माशेलकर यावेळी म्हणाले.

**एसआयआर**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यात एसआयआर अर्थात विशेष सखोल मतदार पुनरिक्षण मोहीम राबविण्यात येत असून मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करण्यासाठी व्यापक जनजागृती करण्याचे निर्देश मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिले. 30 जून ते 29 जुलै 2026 या कालावधीत बीएलओ मतदारांच्या घरी जाऊन माहितीची पडताळणी करणार आहेत. कोणताही पात्र मतदार वगळला जाणार नाही, याची दक्षता घेण्यात येणार असून जिल्ह्यातील 8 हजार 4 शे 17 बीएलओ आणि 4 हजार 5 शे 57 बीएलए या मोहिमेत सहभागी होणार असल्याची माहिती आढावा बैठकीत देण्यात आली.

**जनगणना**

आपण जनगणनेचा विचार करतो तेव्हा आपल्या डोळ्यांसमोर घराघरांत जाऊन माहिती गोळा करणारे कर्मचारी, संगणक, टॅबलेट आणि लोकसंख्येचे प्रचंड आकडे उभे राहतात. परंतु जनगणनेचा इतिहास हा केवळ लोक मोजण्याचा इतिहास नाही; तो मानवी संस्कृती, राज्यकारभार, करव्यवस्था, युद्ध, व्यापार आणि नागरी विकासाचा इतिहास आहे. एखाद्या राजव्यवस्थेला आपल्या राज्यात किती लोक आहेत, किती जमीन लागवडीखाली आहे, किती कर मिळू शकतो आणि युद्धकाळात किती सैनिक उभे राहू शकतात हे जाणून घेण्याची गरज होती. या गरजेतूनच जनगणनेचा जन्म झाला. याविषयी माहिती देत आहेत पुणे जिल्ह्याचे माहिती अधिकारी युवराज पाटील.....

**जगातील पहिल्या जनगणनाचे पुरावे सुमारे सहा हजार वर्षांपूर्वी बाबुलिया आणि इजिप्तमध्ये आढळतात. त्या काळात लोकसंख्या, शेती, पशुधनाची माहिती मातीच्या फलकावर नोंदवली जा. चीनमध्ये इसवी सन दुसऱ्या शतकामध्ये झालेल्या जनगणनेत पाच कोटी शहात्तर लाख लोकांची नोंद झाली. भारतात जनगणनेची परंपरा**

**प्राचीन काळापासून आहे. किल्ल्याच्या अर्थशास्त्रात त्याचा उल्लेख आढळतो. महाराष्ट्रात, सुमारी हा शब्द वापरला जात असे याचे एक रंजक उदाहरण म्हणजे पुण्यातील मंगळवार पेठ पेशवाई संपल्यानंतर अठराशे अठरा मध्ये झालेल्या खाण सुमारीत या पेठेत दोनशे एकसष्ठ घरे सातशे पाच खण चार सरकारी चौक्या आणि विविध समाजाच्या वस्ती असल्याची नोंद आढळते. या नोंदीमुळे दोनशे वर्षांपूर्वीच्या पुण्याचे जिवंत चित्र आपल्यासमोर उभे राहते.**

**सीएनजी**

देशात कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस म्हणजेच सीएनजीचा कोणताही तुटवडा नाही, असं केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी म्हटलं आहे. सरकार घराघरांमध्ये पाईप्ड नॅचरल गॅस अर्थात पीएनजीचा पुरवठा वाढवत असून, एलपीजी जोडणीचं पीएनजी जोडणीमध्ये रूपांतर करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचंही त्यांनी सांगितलं. सध्याच्या जागतिक परिस्थितीचा फायदा घेऊन काही लोक कृत्रिम टंचाई निर्माण करण्याचा आणि अफवा पसरवण्याचा प्रयत्न करत असून, अशा प्रकारच्या गैरप्रकारांवर तात्काळ आणि कडक कारवाई केली असल्याचंही पुरी यांनी सांगितलं.

**ग्रोथ हब**

पुणे जिल्ह्याच्या शाश्वत आणि गतिमान विकासासाठी तयार करण्यात येणाऱ्या पुणे ग्रोथ हब आराखड्याच्या कार्यकारी समितीची बैठक विभागीय आयुक्त कार्यालयात पार पडली. प्रकल्पांच्या पायाभूत सुविधांसाठी पुढील पाच वर्षांत उपलब्ध होणाऱ्या 5 हजार कोटी रुपयांच्या विशेष निधीतून राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांचा प्राधान्यक्रम निश्चित करून आराखडा तयार करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी यावेळी दिल्या. या बैठकीत शाश्वत विकासाला चालना देणारा व्यापक आराखडा तयार करण्यावर बैठकीत भर देण्यात आला.

**निकाल**

महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळामार्फत महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळांमार्फत इयत्ता पाचवी आणि इयत्ता आठवी स्तरावरील मूल्यमापन परीक्षेचा निकाल उद्या दुपारी 1 वाजता www.msbos.mh-ssc.ac.in या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येणार आहे.

**वर्धापन दिन**

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी विद्यालयाचा 41 वा वर्धापनदिन आज उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. संस्थेच्या सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष मिलिंद कांबळे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. शिक्षकांनी आपल्या कार्यात व्रतस्थ राहून विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत योगदान द्यावे तसेच विद्यार्थ्यांनी संशोधन वृत्ती जोपासून ज्ञानार्जनाची नवी क्षितिजे गाठावीत, असा संदेश त्यांनी यावेळी दिला. शाला समिती सदस्य डॉ प्रीती अभ्यंकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी सहा वाजता विविध भारती पुणे केंद्रावर ताज्या पुणे वृत्तांतमध्ये नमस्कार.**